## प्रकरण दुसरे

### कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था मर्यादित, कदमवाडी, ता. करवीर - ऐतिहासिक पार्श्वभूमी व पुनर्पाहणी (१९४६ ते १९८०)

## प्रकरण दुसरे

### " कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था मर्यादित, कदमवाडी, ता. करवीर - ऐतिहासिक पार्श्वभूमी व पुर्नपाहणी (१९४६ ते १९८०) "

### विभाग पहिला

### " कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था मर्यादित, कदमवाडी, ता. करवीर - या संस्थेच्या स्थापनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी "

कदमवाडी या ठिकाणी ४-९-१९४६ रोजी या संस्थेची स्थापना झाली. या संस्थेचे कार्यक्षेत्र कदमवाडी व भोसलेवाडी आहे. कदमवाडी हे गाव १९४६ साली बावडा ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये होते व सध्या कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झालेले आहे. कदमवाडी हे मुख्य कोल्हापूर शहराच्या इशान्येस असून पंचगंगा नदीच्या उजव्या तिरापासून थोड्या अंतरावर वसले आहे. कदमवाडीच्या वायव्य दिशेला भोसलेवाडी, आग्नेय दिशेला जाधववाडी, पश्चिम दिशेला मोहिते कॉलनी आणि दक्षिणेस कपूर वसाहत आहे. कदमवाडीच्या उत्तरेस व पूर्वेस संपूर्ण शेत जमीन आहे. कदमवाडीचा संपूर्ण भाग सखल आहे.

कदमवाडी व भोसलेवाडीचे एकूण लागवडीखालील क्षेत्र ७५० एकर इतके आहे. नदीमुळे गावाला पाण्याची कायम स्वरूपी नैसर्गिक देणगी मिळाली आहे व जून ते सप्टेंबर या काळात येथे जास्त पाऊस पडतो. शेत जमीनीस नदी व विहीरी मधून पाणी उपलब्ध केले जाते.

कदमवाडीमध्ये ४ सप्टेंबर १९४६ ला कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था मर्यादित, कदमवाडी या संस्थेची स्थापना झाली. सुरूवातीस कदमवाडी, भोसलेवाडी व जाधववाडी हे या संस्थेचे कार्यक्षेत्र होते. त्यावेळी त्यांची लोकसंख्या १५०० होती. ही लोकसंख्या

सर्वतोपरी शेतीवरच अवलंबून होती. शेतीमधून प्रामुख्याने भात, शाळू व ऊस ही पिके घेतली जात होती.

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था मर्यादित, कदमवाडी ही संस्था स्थापन होण्यापूर्वीच्या काळात शेतकरी आपली कर्जाची गरज गावातील काही ठराविक श्रीमंत सावकाराकडून कर्जाऊ रक्कम घेऊनच भागवित होते. तसेच गुळ खरेदी करणा-या दलालाकडून (अडत्ये) यांच्याकडून व्याजाने घेत असत. कारण कर्ज मिळविण्यासाठी हाच मार्ग शेतक-यांना सुलभ वाटत होता व त्याशिवाय शेतक-यासमोर पर्याय नव्हता. सावकार व दलाल शेतक-यांना कर्ज देत असत परंतु त्यांचा व्याजाचा दर जास्त असे. जास्त व्याज दर आकारून ते शेतक-यांची पिळवणूक व फसवणूक व आर्थिक शोषण करीत असत. त्यामुळे अनेक गरीब शेतकरी सावकार व दलाल यांच्या विळख्यात अडकत होते. अशी त्या काळातील अवस्था होती. शेतक-यांप्रमाणेच लघुव्यवसाय व उद्योग करणा-या लोकांनाही कर्ज मिळण्याची सोय नव्हती. त्यामुळे शेतकरी आणि कारागीर वर्ग आपला चरितार्थ जे उत्पादन मिळेल त्यावरच चालवित होते. नदीचे पाणी उचलण्यासाठी फारशा सोयी उपलब्ध नव्हत्या. बागायती पीके शेतमाल यांच्या विक्रीचीही योग्य सोय नव्हती. कच्च्या मालावर प्रक्रिया करण्याची सुविधा नव्हती त्यामुळे शेती, शेतकरी यांची योग्य पध्दतीने प्रगती होत नव्हती. कारागिरांचीही कर्ज विषयक गरज पूर्ण होत नव्हती.

शेतक-यांना योग्य वेळी, पुरेशा प्रमाणात, योग्य व्याज दराने कर्ज उपलब्ध करून देऊन त्यांची सावकार व दलाल यांच्याकडून होणारी आर्थिक पिळवणूक थांबविता यावी. शेतक-यांना त्यांच्या शेत मालास योग्य दर मिळवून घावा यासाठी सहकारी तत्वानुसार कार्य करणारी सहकारी पतपुरवठा संस्था निर्माण करावी असा विचार गावातील काही प्रमुख लोकांनी मांडला व त्यासाठी ते प्रयत्न करू लागले.

सुरूवातीस गावातील वीस लोकांनी एकत्र येऊन शेअर भांडवल रूपये ८६५-०० व प्रवेश फी रूपये २०-०० असे एकूण फक्त रू. ८८५-०० असे प्राथमिक भांडवल जमा करून संस्था स्थापन करण्याची मागणी केली. त्यावेळी करवीर इलाख्याच्या को-ऑपरेटीव्ह सोसायटीजचे रजिस्ट्रार यांनी " कदमवाडी को-ऑपरेटीव्ह सोसायटी लिमिटेड, कदमवाडी, पेटा करवीर इलाखा करवीर " ही संस्था कोल्हापूर को-ऑपरेटिव्ह सोसायटीचा ॲक्ट सन १९४५ चे कलम नंबर १५ अन्वये ४ सप्टेंबर, १९४६ रोजी स्थापन करण्यास परवानगी दिली. आणि या संस्थेला ६४१ हा रजिस्ट्रेशन नंबर दिला व पुढे १९५९-६० मध्ये शासनाच्या आदेशानुसार या संस्थेचे रूपांतर " कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था, लि. कदमवाडी, ता. करवीर " असे करून रजिस्ट्रेशन नंबर १३७८६ असा दिला गेला आहे.

या संस्थेच्या स्थापनेसाठी सुरूवातीस जे लोक पुढे आले ते म्हणजेच संस्थेचे प्रवर्तक मंडळ होय. आणि ते प्रवर्तक मंडळ खालील प्रमाणे आहे :

१) ज्ञानू लक्ष्मण पोवार
२) दत्तू लक्ष्मण सेंकपाळ
३) लक्ष्मण दत्तोबा कदम
४) पांडुरंग नानासो पोवार
५) बाळू कृष्णा पोवार
६) विष्णू रामचंद्र पोवार
७) कृष्णाजी परशुराम माळी
८) बाबू पैजारे
९) हरी लक्ष्मण मेढे (पोवार)
१०) ज्ञानदेव मोरबाळे
११) कृष्णा बाबाजी तोरस्कर (कामदार)

१२) श्रीपती जयराम पाटील
१३) रामजी लक्ष्मण मेढे (पोवार)
१४) विठ्ठलराव व्यंकटराव कदम
१५) कृष्णा लक्ष्मण मेढे (पोवार)
१६) रघुनाथ बळवंतराव पोवार
१७) शंकर सुबराव कोपार्डेकर
१८) शंकर लक्ष्मण शापुरे
१९) भाऊ सुबराव पाटील
२०) बापूसो कृष्णा निकम

वरील प्रवर्तक मंडळाचे नेतृत्व रघुनाथ बळवंतराव पोवार यांचेकडे होते. संस्था स्थापन झाल्यानंतर प सुरुवातीचे काळामध्ये सहा सदस्यांचे संचालक मंडळ होते. संस्थेच्या पहिल्या संचालक मंडळामध्ये खालील व्यक्तींचा समावेश होता.

१) रघुनाथ बळवंतराव पोवार (चेअरमन)
२) लक्ष्मण दत्तोबा कदम
३) दत्तू लक्ष्मण संकपाळ
४) पांडुरंग नानासो पोवार
५) बापू कृष्णा निकम
६) विष्णू रामचंद्र पोवार (सेक्रेटरी)

या संस्थेच्या स्थापनेनंतर सुरुवातीस श्री. विष्णू रामचंद्र पोवार यांनी विनावेतन सेक्रेटरी म्हणून काम केले व संस्थेचा हिशोब व कारभार सांभाळला.

12201
A

## विभाग-२

### सन १९४६ ते १९७५-७६ या काळातील कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लिमिटेड, कदमवाडी, ता. करवीर या संस्थेची प्रगती

दिनांक ४-९-१९४६ रोजी या सहकारी संस्थेची स्थापना झालेली आहे. सुरुवातीच्या काही वर्षांचे छापील अहवाल उपलब्ध नाहीत. १९५६-५७ पासूनचे वार्षिक अहवाल उपलब्ध आहेत. त्या उपलब्ध अहवालानुसार व मिळालेल्या माहितीनुसार कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था मर्यादित, कदमवाडी या संस्थेची १९७६-७७ पर्यन्तची प्रगती खालील मुद्यामध्ये मांडली आहे.

१. संस्थेचे सुरु केलेले उपक्रम
२. सभासद संख्या
३. भाग भांडवल
४. सभासदांच्या व बिगर सभासदांच्या ठेवी
५. संस्थेचे राखीव व इतर निधी
६. बँककडून संस्थेने घेतलेले कर्ज
७. खेळते भांडवल
८. नफा
९. कर्ज पुरवठा
१०. थकबाकी
११. ऑडीट वर्ग
१२. संस्थेचे सभापती व त्यांचा कालावधी

१) संस्थेने सुरु केलेले उपक्रम :

१९४६ पासून १९७६-७७ पर्यन्तची प्रगती होत असताना या संस्थेने खालील उपक्रम कार्यान्वित केले आहेत.

अ) स्वस्त धान्य दुकान -

लोकांना गहू, तांदुळ, रॉकेल इ. प्रकारच्या जीवनावश्यक वस्तू योग्य किंमतीस व योग्य वेळी उपलब्ध व्हाव्यात म्हणून १९५१-५२ साली संस्थेने स्वस्त धान्य दुकान सुरू केले व लोकांच्या दैनंदिन उपजिवीकेचा प्रश्न सुलभ केला.

ब) अडत दुकान -

दिनांक २७-११-१९५८ रोजी कार्यकारी समितीने ठराव क्र.२ नुसार संस्थेमार्फत अडत दुकान सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार १-१२-१९५८ रोजी अडत दुकान शाहू मार्केट यार्ड मध्ये सुरू करण्यात आले.

अडत दुकान सुरू करण्याचा हेतू असा होता की, यापूर्वी संस्थेच्या सभासदांचा गुळ शेतकरी सहकारी संघ लि., कोल्हापूर यांचेमार्फत विक्री होत असे. १९५८ मध्ये गुळ मार्केट यार्ड हलविण्याच्या कामी शेतकरी सहकारी संघ लि., कोल्हापूर यांनी पुढाकार घेतला. त्यामुळे शेतकरी सहकारी संघावर व्यापारी लोकांचा अनाठाई रोष निर्माण झाला व त्यांनी संघाकडून माल घेणे बंद केले. अशा परिस्थितीमध्ये आपल्या मालाची विक्री सुव्यवस्थितपणे झाली पाहिजे असा विचार सभासदांनी मांडला व शाहू मार्केट यार्डमध्ये अडत दुकान सुरू करण्याचा निर्णय घेतला. हे अडत दुकान सुरू करण्यासाठी त्यावेळचे शेतकरी सहकारी संघाचे मॅनेजिंग डायरेक्टर मोहितेसाहेब यांनी प्रोत्साहन देऊन मदत केली.

अडत दुकान सुरू करण्याचे उद्देश :

खालील उद्दिष्टांसाठी अडत दुकान सुरू करण्यात आले.

१) आपल्या संस्थेच्या सभासदांच्या शेतमालाची विक्री, संस्थेमार्फत व्हावी.

२) आपल्या संस्थेच्या सभासदांच्या शेतमालास योग्य किंमत मिळावी.

३) सभासदांनी संस्थेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड मुदतीमध्ये करून घेता यावी.

अडत दुकान देखरेख -

दिनांक १-१२-१९५८ पासून संस्थेने मॅनेजिंग कमिटीचे सदस्य श्री. बी.एम. कणसे यांच्याकडे गुळ विभाग मॅनेजर म्हणून जबाबदारी सोपविली. ती त्यांनी १७-१-१९५९ पर्यन्त पेलली. तदनंतर श्री.व्ही. आर. पोवार यांच्याकडे गुळ विभाग मॅनेजर म्हणून जबाबदारी देण्यात आली व ती त्यांनी पार पाडली. १९६२ साली संस्थेने अडत दुकान विभाग बंद केला.

क) वाचनालय :

सभासदांना व कार्यक्षेत्रातील लोकांना ज्ञान मिळावे तसेच त्यांना दैनंदिन जागतिक घटना समजावून घेता याव्यात यासाठी १९५९ मध्ये संस्थेमार्फत वाचनालय सुरू करण्यात आले व वाचनालयामार्फत सभासदांना पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके इ. उपलब्ध करून दिली गेली.

ड) शेती अवजारे :

शेतकऱ्यांनी शेतीमधून जास्तीत जास्त उत्पादन घेण्यासाठी शेतीची मशागत आधुनिक शेती अवजारांच्या साहाय्याने करणे गरजेचे आहे परंतु आपले सभासद शेतकरी आर्थिकदृष्ट्या गरीब आहेत. ते स्वत: जवळ असलेल्या पैशाच्या साहाय्याने आधुनिक शेती अवजारे खरेदी करू शकत नाहीत हे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना समजले. म्हणून २४-९-१९६० च्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र. ६ नुसार भाडेपट्याने देण्यासाठी संस्थेने खालील शेती अवजारे खरेदी केली.

| | |
|---|---|
| १. रिझार | २. ठाकूर नांगर |
| ३. स्प्रे पंप | ४. डस्ट पंप |
| ५. ऊसाची सुकस ड्रिपी | ६. किमी (माती लेव्हल करणेचे साधन) |
| ७. कोकण प्लवा | ८. कल्टी व्हेटर |
| ९. जपानी कोळपे | |

वरील शेती अवजारे सभासद शेतक-यांना योग्य त्या माडे-पट्टयाने संस्थेमार्फत उपलब्ध करून दिली जातात.

इ) गोडावून :

सभासद जो शेतमाल उत्पादित करतात त्यांना योग्य दर मिळेपर्यन्त शेतमाल व्यवस्थितपणे, शास्त्रीय पध्दतीने साठवून ठेवण्यासाठी १९७६ साली संस्थेने गोडावून बांधले व त्यामध्ये संस्थेच्या मालकीचा माल साठविला जातो. त्याप्रमाणे योग्य शुल्क घेऊन सभासद शेतक-यांना माल साठवण करण्याची सोय उपलब्ध करून दिली जाते.

२) सभासद संख्या :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लिमिटेड, कदमवाडी या संस्थेची स्थापना दिनांक ४-९-१९४६ रोजी झाली. त्यावेळी सभासद संख्या फक्त २० इतकी होती व यांनी पुढाकार घेऊन ही संस्था चालविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यानंतर १९७६-७७ पर्यन्त सभासद संख्या वाढत गेलेली आहे. संस्थेच्या सभासदांमध्ये सर्व जाती-धर्मांच्या लोकांचा समावेश असल्याचे दिसून येते. हिंदु, मुसलमान, हरिजन यासह इतरही लोक आपल्या समान आर्थिक कल्याणासाठी या संस्थेच्या सभासदाच्या रूपाने एकत्रित आले आहेत.

या संस्थेच्या सभासदांमध्ये बहुतांश सभासदांचा शेती हाच व्यवसाय आहे. शेतीला मिळणाऱ्या कर्जपुरवठा व इतर सुविधा यासाठी ते एकत्रित आले आहेत. शेतीशिवाय व्यापार व लहान व्यवसाय करणारे कारागीर लोकही संस्थेचे सभासद होते. भिन्न उत्पन्न गटातील लोक सभासद आहेत. पुढील तक्त्यावरून सभासद संख्येबाबतची माहिती मिळते.

तक्ता क्रमांक २.१

सभासद संख्या

| वर्ष | सभासद संख्या |
|---|---|
| १९५६-५७ | २२२ |
| १९५७-५८ | २२२ |
| १९५८-५९ | २३४ |
| १९५९-६० | २६३ |
| १९६०-६१ | २८१ |
| १९६१-६२ | २८३ |
| १९६२-६३ | २८५ |
| १९६३-६४ | २८६ |
| १९६४-६५ | २८३ |
| १९६५-६६ | २९० |
| १९६६-६७ | २९९ |
| १९६७-६८ | ३११ |
| १९६८-६९ | ३२९ |
| १९६९-७० | ३३० |
| १९७०-७१ | ३६७ |
| १९७१-७२ | ४०४ |
| १९७२-७३ | ४०९ |
| १९७३-७४ | ४०९ |
| १९७४-७५ | ३९० |
| १९७५-७६ | ३८९ |

वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की, १९६४-६५ व १९७४-७५ ही दोन वर्षे वगळता संस्थेच्या सभासद संख्येमध्ये सातत्याने वाढ होत आहे. १९६३-६४ मध्ये सभासद संख्या २८६ होती तर १९६४-६५ साली ती २८३ झाली म्हणजे या वर्षी सभासद संख्येत घट झाली कारण काही सभासदांनी सभासदत्व रद्द केले.

तसेच १९७३-७४ मध्ये सभासद संख्या ४०९ होती व ती १९७४-७५ मध्ये घटून ३९० झाली कारण १९७३-७४ अखेर सभासद ४०९ होते. १९७४-७५ मध्ये ४ नवीन सभासद झाले आणि जाधववाडीमध्ये नवीन स्वतंत्र संस्था स्थापन करण्यात आली. त्यामुळे जाधववाडीचे १३ सभासद कमी झाले. म्हणून १९७४-७५ मध्ये सभासद संख्या १९७३-७४ पेक्षा कमी आहे.

३) भाग भांडवल :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लिमिटेड, कदमवाडी या संस्थेने सुरुवातीस फक्त ८८५-०० रुपये इतक्या भाग भांडवलावर सुरुवात केली. १९५६ पर्यन्तचे संस्थेचे अहवाल उपलब्ध नाहीत. परंतु १९५६-५७ नंतर या संस्थेच्या भाग भांडवलाची माहिती खालीलप्रमाणे :

तक्ता क्र. २.२

भाग भांडवल

| वर्ष | भाग भांडवल (रुपयात) |
|---|---|
| १९५६-५७ | ८,९३५ |
| १९५७-५८ | ११,७६० |
| १९५८-५९ | २०,१३० |
| १९५९-६० | २४,१८५ |
| १९६०-६१ | ३१,२३० |
| १९६१-६२ | ३४,८१५ |
| १९६२-६३ | ३४,८२५ |
| १९६३-६४ | ३८,६२५ |
| १९६४-६५ | ४१,७९० |
| १९६५-६६ | ४६,१४५ |
| १९६६-६७ | ५२,७६५ |
| १९६७-६८ | ६२,३५० |
| १९६८-६९ | ६८,३८० |
| १९६९-७० | ७४,९३० |
| १९७०-७१ | ८८,३६० |
| १९७१-७२ | ९७,२१५ |
| १९७२-७३ | १,०५,०९५ |
| १९७३-७४ | १,०९,३८० |
| १९७४-७५ | १,०६,७२० |
| १९७५-७६ | १,१०,०७५ |

वरील तक्त्यातील भाग भांडवलाची आकडेवारी पाहिल्यानंतर असे दिसून येते की, या संस्थेच्या भाग भांडवलात सातत्याने वाढ झालेली आहे. परंतु १९७४-७५ या वर्षी संस्थेच्या भाग भांडवलामध्ये घट झालेली आहे. म्हणजेच १९७३-७४ साली संस्थेचे भाग भांडवल रु. १,०९,३८० होते. तर १९७४-७५ साली ते घटून रु. १,०६,७२० झाले. कारण १९७४-७५ साली संस्थेच्या कार्यक्षेत्रातून जाधववाडी हे गाव वगळण्यात आले. त्यामुळे जाधववाडीतील सभासद रद्द करून त्यांची भाग भांडवलाची रक्कम परत करण्यात आली. म्हणून १९७४-७५ या वर्षी भाग भांडवलात घट झाल्याचे दिसून येते. परंतु १९७५-७६ मध्ये भाग भांडवलामध्ये वाढ झालेली आहे.

४) <u>सभासद व बिगर सभासदांच्या ठेवी</u> :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लिमिटेड, कदमवाडी या संस्थेने सभासद आणि बिगर सभासद यांच्याकडून सुरुवातीपासूनच ठेवी जमा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. संस्थेकडे सभासद व बिगर सभासदांनी ठेवलेल्या ठेवींची आकडेवारी खालील प्रमाणे :

## तक्ता क्र. २.३

## सभासद व बिगर सभासदांच्या ठेवी

(आकडे रुपयात)

| वर्ष | ठेवी | | एकूण ठेवी |
|---|---|---|---|
| | सभासदांच्या ठेवी | बिगर सभासदांच्या ठेवी | |
| १९५६-५७ | १,९१२-५० | १,४००-०० | ३,३१२-५० |
| १९५७-५८ | २,२१३-०० | १,४००-०० | ३,६१३-०० |
| १९५८-५९ | २१२-५० | १,४००-०० | १,६१२-५० |
| १९५९-६० | १२-५० | १,४००-०० | १,४१२-५० |
| १९६०-६१ | १,५१२-५० | २,४५०-०० | ३,९६२-५० |
| १९६१-६२ | १२-५० | ३,५०४-७० | ३,५१७-२० |
| १९६२-६३ | १२-५० | १,४००-०० | १,४१२-५० |
| १९६३-६४ | १२-५० | १,४००-०० | १,४१२-५० |
| १९६४-६५ | १२-५० | १,४००-०० | १,४१२-५० |
| १९६५-६६ | २,३१२-५० | १,४००-०० | ३,७१२-५० |
| १९६६-६७ | ७१२-५० | १,४००-०० | २,११२-५० |
| १९६७-६८ | १,०४२-५० | - | १,०४२-५० |
| १९६८-६९ | ६४२-५० | - | ६४२-५० |
| १९६९-७० | ४४२-५० | - | ४४२-५० |
| १९७०-७१ | ९४२-५० | - | ९४२-५० |
| १९७१-७२ | ४४२-५० | - | ४४२-५० |
| १९७२-७३ | ११७-५० | - | ११७-५० |
| १९७३-७४ | ६,५२७-५० | - | ६,५२७-५० |
| १९७४-७५ | १४,५२७-५० | - | १४,५२७-५० |
| १९७५-७६ | १८,४६७-५० | - | १८,४६७-५० |

वरील आकडेवारीवरुन असे दिसून येते की, सभासद व बिगर सभासद यांनी संस्थेकडे फारशा ठेवी ठेवलेल्या नाहीत. १९५६ पासून १९७२-७३ पर्यन्त सभासदांच्या ठेवीमध्ये सातत्याने चढउतार झालेला

आहे. बिगर सभासदांच्या ठेवीमध्ये १९६०-६१ व १९६१-६२ या दोन वर्षी ठेवीची रक्कम वाढलेली आहे. १९६७-६८ पासून १९७५-७६ पर्यन्त बिगर सभासदांची ठेव शुन्य आहे. कारण संस्थेकडून ठेवी काढून घेतलेल्या आहेत. १९७३-७४ पासून १९७५-७६ पर्यन्त सभासदांच्या ठेवीमध्ये वाढ झालेली आहे. कारण सभासदांना कर्ज देते वेळी त्यांच्याकडून शेअर्स खेरजी ठेव घेतली गेली आहे. म्हणजेच १९७२-७३ पर्यन्त ठेवीचे प्रमाण कमी आहे.

५) संस्थेचे राखीव व इतर निधी :

संस्थेच्या राखीव निधी व इतर निधींची आकडेवारी खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे :

## तक्ता क्र. २.४

### संस्थेचे राखीव व इतर निधी

(आकडे रुपयात)

| वर्ष | राखीव निधी | विशेष राखीव निधी | इमारत निधी | एकूण निधी |
|---|---|---|---|---|
| १९५६-५७ | २,०३०-१२ | १५९-८१ | ४६७-२८ | २,६५७-२१ |
| १९५७-५८ | २,४९५-०० | १६०-०० | ४६७-०० | ३,०२२-०० |
| १९५८-५९ | ३,३३५-६१ | १६५-११ | ४७७-२८ | ३,९७४-०० |
| १९५९-६० | ३,५०७-८५ | १६५-११ | ४७७-२८ | ४,१५०-२४ |
| १९६०-६१ | ३,६८८-७२ | १६५-११ | ४७७-२८ | ४,३३१-११ |
| १९६१-६२ | ८,६२०-६८ | २,०७०-७५ | ६,२२७-२८ | १६,९१८-७१ |
| १९६२-६३ | ९,७८१-३० | २,०७०-७५ | ६,२२७-२८ | १८,०७९-३३ |
| १९६३-६४ | ११,२१५-८७ | २,०७०-७५ | ६,२२७-२८ | १९,५१३-९० |
| १९६४-६५ | ११,६८०-३२ | २,०७०-७५ | ६,२२७-२८ | १९,९७८-३५ |
| १९६५-६६ | १२,२५७-७४ | २,०७०-७५ | ६,२२७-२८ | २०,५५५-७७ |
| १९६६-६७ | १२,५४०-६४ | २,०७०-७५ | ६,२२७-२८ | २०,८३८-६७ |

तक्ता क्रमांक २.४ (पुढे चालू...)

| वर्ष | राखीव निधी | विशेष राखीव निधी | इमारत निधी | एकूण निधी |
|---|---|---|---|---|
| १९६७-६८ | १२,८२०-०० | २,७७०-७५ | ६,२७०-०० | २१,१६०-७५ |
| १९६८-६९ | १३,४४७-३६ | २,७७०-७५ | ६,६८६-२८ | २२,२०४-३९ |
| १९६९-७० | १३,९४५-१५ | २,७७०-७५ | ६,६८६-२८ | २२,७०२-१८ |
| १९७०-७१ | १५,२७७-०७ | २,७७०-७५ | ८,३६२-५७ | २५,७१०-३९ |
| १९७१-७२ | १७,४२५-१४ | २,७७०-७५ | ८,३६२-५७ | २७,८५८-४६ |
| १९७२-७३ | १७,९५६-६६ | २,७७०-७५ | ८,३६२-५७ | २८,३८९-९८ |
| १९७३-७४ | १८,७४६-६१ | २,७७०-७५ | ८,३६२-५७ | २९,१७९-९३ |
| १९७४-७५ | १९,१२३-३८ | २,७७०-७५ | ८,३६२-५७ | २९,५५६-७० |
| १९७५-७६ | २०,७११-६६ | २,७७०-७५ | ८,३६२-५७ | ३१,१४५-०८ |

वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की, सहकारी कायद्यातील तरतुदीनुसार आर्थिक सुरक्षिततेसाठी या संस्थेने दरवर्षी राखीव निधी निर्माण केलेला आहे व त्यामध्ये १९५६-५७ पासून १९७५-७६ पर्यन्त सातत्याने वाढ होत आहे.

त्याचप्रमाणे १९५८-५९ मध्ये विशेष राखीव निधी रू. १६५-११ होता. १९६०-६१ पर्यन्त रू. १६५-११ इतकाच होता. १९६१-६२ मध्ये विशेष राखीव निधी रू. २०७०-७५ होता व १९७५-७६ पर्यन्त त्यामध्ये वाढ किंवा घट झालेली नाही.

या संस्थेने इमारत निधी निर्माण केलेला आहे. १९५६-५७ मध्ये व १९५७-५८ मध्ये तो रू. ४६७-०० होता. १९५८-५९ ते १९६०-६१ या तीन वर्षात तो रू. ४७७-२८ हातो. म्हणजे १९५८-५९ ते १९६०-६१ या तीन वर्षात इमारत निधीमध्ये वाढ झालेली नाही. १९६१-६२मध्ये इमारत निधी रू. ६२२७-२८ होता. १९६६-६७ पर्यन्त तो रू. ६२२७-२८ होता. म्हणजे १९६१-६२ ते १९६६-६७ या ६ वर्षात तो कायम आहे. १९७०-७१ मध्ये इमारत निधी रू. ८३६२-५७ होता व १९७५-७६ पर्यन्त रू. ८३६२-५७ इतकाच होता म्हणजे १९७०-७१ ते १९७५-७६ या वर्षात इमारत निधीमध्ये वाढ झालेली नाही.

१९५६-५७ पासून १९७५-७६ पर्यन्तचे एकूण निधीचे आकडे पाहिल्यास असे दिसून येते की, या संस्थेच्या निधीमध्ये सातत्याने वाढ होत आहे.

<u>बँक कर्ज</u> :

सद्याप्रमाणेच पूर्वीसुध्दा कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी ही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज घेत होती. १९५६-५७ ते १९७५-७६ पर्यन्त संस्थेने बँकेकडून घेतलेली कर्जे खालीलप्रमाणे :

तक्ता क्र. २.५

बँक कर्ज

| वर्ष | संस्थेने घेतलेले बँक कर्ज (रुपयात) |
|---|---|
| १९५६-५७ | २९,०३२ |
| १९५७-५८ | ३२,१९१ |
| १९५८-५९ | ७३,९७९ |
| १९५९-६० | १,१०,१११ |
| १९६०-६१ | १,२४,५२१ |
| १९६१-६२ | १,३३,५६० |
| १९६२-६३ | ८३,५८१ |
| १९६३-६४ | ७५,०५४ |
| १९६४-६५ | ६७,६७१ |
| १९६५-६६ | ९७,०७८ |
| १९६६-६७ | १,३३,५४९ |
| १९६७-६८ | १,९३,७४० |
| १९६८-६९ | १,२०,५६६ |
| १९६९-७० | १,६१,७७० |
| १९७०-७१ | २,१०,१३२ |
| १९७१-७२ | १,७९,२५१ |
| १९७२-७३ | १,३३,९४० |
| १९७३-७४ | ९३,००८ |
| १९७४-७५ | २,७८,६७८ |
| १९७५-७६ | १,७५,७१२ |

वरील तक्ता असे दर्शवितो की, १९५६-५७ मध्ये संस्थेने २९,०३२ रुपये कर्ज घेतलेले आहे. १९६१-६२ पर्यन्त संस्थेचे बँक कर्ज घेण्याचे प्रमाण वाढत गेलेले आहे. परंतु १९६२-६३ मध्ये कर्ज घेण्याच्या प्रमाणात घट झालेली आहे. १९६५-६६ या वर्षापासून परत बँक कर्ज घेतलेले प्रमाण वाढले आहे. १९७३-७४ मध्ये हे प्रमाण आणखी कमी झालेले आहे.

कारण संस्था सभासदांना मागणीनुसार कर्ज पुरवठा करते. लोकांची कर्जाची मागणी किती आहे हे विचारात घेऊनच गरजेनुसार बँक कर्ज संस्थेने उचलले आहे.

संस्थेचे खेळते भांडवल :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेचे भाग भांडवल सुरुवातीस फारच कमी होते. खेळत्या भांडवलामध्ये सभासद व बिगर सभासदांकडील ठेवी, बँकेकडून घेतलेले कर्ज, मिळालेले व्याज, प्रवेश फी देणाऱ्या या सर्वांचा समावेश भाग भांडवलात केला जातो. भाग भांडवलाचे आकडे पुढील प्रमाणे आहेत :

## तक्ता क्र. २.६

### संस्थेचे स्वकते भांडवल

(रुपयात)

| वर्ष | स्वकते भांडवल |
|---|---|
| १९५६-५७ | ३३,२४४ |
| १९५७-५८ | ५४,५५२ |
| १९५८-५९ | १,०४,५५० |
| १९५९-६० | १,३६,६१६ |
| १९६०-६१ | १,८१,१८२ |
| १९६१-६२ | १,९४,७०४ |
| १९६२-६३ | १,४७,८५१ |
| १९६३-६४ | २,६१,९८७ |
| १९६४-६५ | १,४०,२८७ |
| १९६५-६६ | १,६६,६७७ |
| १९६६-६७ | १,९५,४२७ |
| १९६७-६८ | २,५५,७४७ |
| १९६८-६९ | २,१५,९२१ |
| १९६९-७० | २,३४,२७० |
| १९७०-७१ | २,९९,९५९ |
| १९७१-७२ | २,९५,३७२ |
| १९७२-७३ | ३,१०,९८४ |
| १९७३-७४ | २,८०,५३५ |
| १९७४-७५ | ३,८०,११४ |
| १९७५-७६ | ३,८४,३०३ |

संस्थेच्या खेळत्या भाग भांडवलाची आकडेवारी पाहिल्यास असे दिसून येते की, १९५६-५७ पासून १९६१-६२ पर्यन्त खेळते भांडवल वाढत आहे. परंतु १९६२-६३ मध्ये संस्थेच्या खेळत्या भांडवलामध्ये घट झालेली आहे. म्हणजेच १९६१-६२ मध्ये खेळते भांडवल रु. १,९४,७०४ होते ते घटून १९६२-६३ मध्ये रु. १,४७,८५१ झाले.

त्याचप्रमाणे १९६४-६५, १९६८-६९, १९७३-७४ मध्ये सुध्दा खेळते भांडवल घटलेले आहे. कारण संस्था ठेवी जमा करण्यामध्ये फारशी यशस्वी झालेली नाही. आणि बँक कर्ज हे कमी जास्त रकमेने घेतलेले आहे. त्यामुळे खेळते भांडवलामध्ये वाढ, घट दिसून येत आहे.

<u>नफा</u> :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास)सेवा संस्थेला १९५६-५७ ते १९७५-७६ या कालखंडात झालेला नफा तक्ता क्र.२.७ मध्ये दर्शविला आहे.

## तक्ता क्र. २.७

### नफा

| वर्ष | नफा (रुपयात) |
| --- | --- |
| १९५६-५७ | ४७९-०० |
| १९५७-५८ | १,२९४-०० |
| १९५८-५९ | १,०२२-०० |
| १९५९-६० | ३,६९०-०० |
| १९६०-६१ | ८,३३१-०० |
| १९६१-६२ | ५,६४०-०० |
| १९६२-६३ | २,५०५-०० |
| १९६३-६४ | १,५९५-०० |
| १९६४-६५ | - |
| १९६५-६६ | - |
| १९६६-६७ | ७५३-०० |
| १९६७-६८ | २,७४२-०० |
| १९६८-६९ | ४,६५०-०० |
| १९६९-७० | १,१८०-०० |
| १९७०-७१ | ७,२७७-०० |
| १९७१-७२ | १८,४८३-०० |
| १९७२-७३ | ३९५-०० |
| १९७३-७४ | १०,०७४-०० |
| १९७४-७५ | ८,१७४-०० |
| १९७५-७६ | १४,७५९-०० |

१९५६-५७ मध्ये संस्थेला फक्त ४७९-०० रूपये नफा झाला. म्हणजेच सुरूवातीस संस्थेला कमी नफा मिळालेला आहे. परंतु नंतर मात्र तो वाढत गेलेला आहे. १९६०-६१ मध्ये संस्थेला रू. ८,३३१-०० नफा झाला. १९६१-६२ मध्ये संस्थेला मिळालल्या नफ्यामध्ये घट झालेली आहे. १९६१-६२ मध्ये संस्थेला रू.५,६४०-०० नफा झाला. १९६३-६४ पर्यन्त संस्थेला मिळणारा नफा हा घटतच गेलेला आहे कारण १९६२-६३ साली संस्थेला रू. २,५०५ व १९६३-६४ साली रू. १,५९५-०० नफा झालेला आहे.

१९६४-६५ व १९६५-६६ मध्ये संस्थेला नफा झालेला नाही. १९६६-६७ मध्ये संस्थेला रू. ७५३-०० नफा झाला. १९७१-७२ साली रू. १८,४८३-०० नफा झाला व परत १९७२-७३ मध्ये तो घटून रू. ३९५-०० नफा झाला.

म्हणजेच नफ्यामध्ये चढ-उतार झालेले आहेत कारण काही तांत्रिक अडचणीमुळे संस्थेच्या व्यवसायावर प्रतिकूल परिणाम झाल्याने नफा कमी मिळालेला आहे.

<u>संस्थेने केलेला कर्ज पुरवठा</u> :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेने सभासदांना केलेला कर्ज पुरवठा पुढील तक्त्यामध्ये दर्शविला आहे.

## तक्ता क्र. २.८

## संस्थेने केलेला कर्ज पुरवठा

| वर्ष | संस्थेने केलेला कर्ज पुरवठा |
|---|---|
| १९५६-५७ | २९,०३२-०० |
| १९५७-५८ | ४८,९८४-०० |
| १९५८-५९ | १,०५,८४६-०० |
| १९५९-६० | १,३२,४६९-०० |
| १९६०-६१ | १,५८,९३७-०० |
| १९६१-६२ | ८९,०५३-०० |
| १९६२-६३ | २५,८१९-०० |
| १९६३-६४ | ७५,६०२-०० |
| १९६४-६५ | ५९,७८३-०० |
| १९६५-६६ | ८२,१९३-०० |
| १९६६-६७ | १,२६,६९८-०० |
| १९६७-६८ | १,८८,८७०-०० |
| १९६८-६९ | १,३०,९७८-०० |
| १९६९-७० | १,५७,७३६-०० |
| १९७०-७१ | २,२४,४२९-०० |
| १९७१-७२ | १,७२,२८१-०० |
| १९७२-७३ | २,५४,५३७-०० |
| १९७३-७४ | ३,००,३४०-०० |
| १९७४-७५ | ३,१४,७११-०० |
| १९७५-७६ | १,६८,४८६-०० |

या संस्थेने सभासदांना केलेला कर्ज पुरवठा काही वर्षी जास्त केलेला आहे तर काही वर्षी तो कमी केलेला आहे. १९५६-५७ मध्ये संस्थेने रू. २९,०३२-०० इतका कर्ज पुरवठा केला. त्यानंतर १९६०-६१ पर्यन्त कर्ज पुरवठयाचे प्रमाण वाढत गेलेले आहे. कारण १९६०-६१ मध्ये संस्थेने रू. १,५८,९३७-०० इतका कर्ज पुरवठा केला आहे. म्हणजे १९५६-५७ पेक्षा १९६०-६१ मध्ये कर्ज पुरवठा ५ पटीने वाढलेला आहे.

परंतु १९६१-६२ मध्ये परत कर्ज पुरवठयामध्ये घट झालेली आहे. कारण १९६१-६२ मध्ये संस्थेने रू. ८९,०५३-०० इतका कर्ज पुरवठा केला. सर्वात कमी कर्ज पुरवठा १९६२-६३ मध्ये करण्यात आला आहे. १९६२-६३ मध्ये संस्थेने फक्त रू. २५,८१९-०० इतका कर्ज पुरवठा केलेला आहे. नंतर १९६३-६४ पासून परत १९६७-६८ पर्यन्त कर्ज पुरवठयाचे प्रमाण वाढत गेलेले आहे. कारण १९६७-६८ मध्ये संस्थेने रू. १,८८,८७०-०० इतका कर्ज पुरवठा केलेला आहे. परत १९६८-६९ मध्ये कर्ज पुरवठयात घट झालेली आहे. त्यानंतर १९६९-७० मध्ये कर्ज पुरवठयाचे प्रमाण वाढून ते रू. १,५७,७३६-०० इतके झाले. १९७४-७५ मध्ये संस्थेने रू.३,१४,७११-०० इतका कर्ज पुरवठा केला तर १९७५-७६ मध्ये त्यात घट झालेली आहे. कारण १९७५-७६ मध्ये संस्थेने रू. १,६८,४८६-०० इतका कर्ज पुरवठा केलेला आहे.

<u>थकबाकी</u> :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेचे १९५६-५७ ते १९७५-७६ काळातील थकबाकीचे अंक खालील तक्त्यामध्ये दर्शविले आहेत.

## तक्ता क्र.२.९

### थकबाकी

| वर्ष | थकबाकी (रुपयात) |
|---|---|
| १९५६-५७ | २,९११-०० |
| १९५७-५८ | २,८४०-०० |
| १९५८-५९ | २,८०१-०० |
| १९५९-६० | ३,५६०-०० |
| १९६०-६१ | - |
| १९६१-६२ | १४,४५१-०० |
| १९६२-६३ | २५,८१९-०० |
| १९६३-६४ | २४,०२६-०० |
| १९६४-६५ | ३५,०४४-०० |
| १९६५-६६ | २३,०९९-०० |
| १९६६-६७ | २५,००३-०० |
| १९६७-६८ | १,५९,६६६-०० |
| १९६८-६९ | १,४१,४४९-०० |
| १९६९-७० | ८१,७३६-०० |
| १९७०-७१ | ५०,३३९-०० |
| १९७१-७२ | ५९,८६०-०० |
| १९७२-७३ | ६५,६१६-०० |
| १९७३-७४ | ६९,९६९-०० |
| १९७४-७५ | १,२८,७८७-०० |
| १९७५-७६ | १,३३,२८७-०० |

१९५६-५७ पासून १९५९-६० पर्यन्त संस्थेकडे थकबाकीचे प्रमाण कमी आहे. कारण १९५६-५७ मध्ये थकबाकी रू. २,९११-०० होती. तर १९५९-६० मध्ये रू.३,५६०-०० होती. परंतु १९६०-६१ मध्ये संस्थेकडे थकबाकी शून्य आहे. १९६१-६२ नंतर १९६४-६५ पर्यन्त थकबाकीचे प्रमाण वाढत गेलेले आहे. कारण १९६१-६२ मध्ये थकबाकी रू. १४,४५१-०० होती व १९६४-६५ मध्ये ती वाढून रू. ३५,०४४-०० इतकी झालेली आहे. १९६५-६६ मध्ये थकबाकीमध्ये थोडीशी घट होऊन ती रू. २३,०९९-०० झाली. परत १९६६-६७ मध्ये थकबाकी मध्ये वाढ होऊन ती रू.२५,००३-०० इतकी झाली. १९६७-६८ मध्ये थकबाकीचे प्रमाण खूपच वाढले आहे कारण १९६७-६८ मध्ये थकबाकी रू. १,५९,६६६-०० इतकी होती. १९६८-६९ मध्ये त्यात थोडीशी घट होऊन ती रू. १,४१,४४९-०० इतकी झाली. १९६८-६९ या वर्षाच्या थकबाकीशी तुलना करता १९७५-७६ पर्यन्त थकबाकी कमी झालेली आहे.

<u>ऑडिट वर्ग</u> :

सहकारी संस्थांची हिशोब तपासणी झाल्यानंतर संस्थेला ऑडीट वर्ग दिला जातो. या संस्थेला १९५६-५७ पासून १९७५-७६ पर्यन्त मिळालेला ऑडीट वर्ग पुढील तक्त्यामध्ये दर्शविला आहे.

**<u>तक्ता क्र. २.१०</u>**

**<u>ऑडिट वर्ग</u>**

| वर्ष | ऑडिट वर्ग |
|---|---|
| १९५६-५७ | ब |
| १९५७-५८ | ब |
| १९५८-५९ | ब |
| १९५९-६० | अ |
| १९६०-६१ | अ |
| १९६१-६२ | ब |
| १९६२-६३ | ब |
| १९६३-६४ | ब |
| १९६४-६५ | ब |
| १९६५-६६ | क |
| १९६६-६७ | क |
| १९६७-६८ | क |
| १९६८-६९ | ब |
| १९६९-७० | क |
| १९७०-७१ | क |
| १९७१-७२ | ब |
| १९७२-७३ | ब |
| १९७३-७४ | ब |
| १९७४-७५ | क |
| १९७५-७६ | क |

१९५६-५७ ते १९५८-५९ पर्यन्त संस्थेला ब वर्ग मिळालेला आहे. तर १९५९-६० व १९६०-६१ या दोन् वर्षी ` अ ` वर्ग मिळालेला आहे. परत १९६१-६२ पासून १९६४-६५ पर्यन्त ` ब ` वर्ग मिळालेला आहे. आणि १९६५-६६ पासून १९६७-६८ पर्यन्त ` क ` वर्ग मिळालेला आहे. नंतर १९६९-७०, १९७०-७१, १९७४-७५ व १९७५-७६ या वर्षीही ` क ` वर्ग मिळालेला आहे.

संस्थेचे सभापती व त्यांचा कालावधी :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेच्या सभापतीचा १९४६ पासून ते १९७५-७६ पर्यन्तचा कालावधी खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र.२.११

संस्थेचे सभापती व त्यांचा कालावधी

| अनु. | सभापतीचे नाव | सभापतीपदाचा कालावधी |
|---|---|---|
| १. | रघुनाथराव बळवंतराव पोवार | १९४६ ते ४८ |
| २. | लक्ष्मणराव दत्तोबा कदम | १९४८ ते ५३ |
| ३. | विष्णूपंत गणपतराव पाटील | १९५३ ते ५७ |
| ४. | भुजंगराव बळवंतराव काटे | १९५७ ते ५८ |
| ५. | विष्णुपंत गणपतराव पाटील | १९५८ ते ६१ |
| ६. | विष्णूपंत रामचंद्र पोवार | १९६१ ते ६३ |
| ७. | विष्णूपंत गणपतराव पाटील | १९६३ ते २१-१२-६३ |
| ८. | बाबूराव महादेव कणसे | २२-१२-६३ ते २४-११-६५ |
| ९. | वसंतराव दत्तोबा जाधव | २५-११-६५ ते ९-१२-६५ |
| १०. | विष्णूपंत गणपतराव पाटील | १९६५-७० |
| ११. | संभाजीराव गणपतराव कदम | १९७०-७१ |
| १२. | विष्णूपंत गणपतराव पाटील | १९७१ ते ७४ |
| १३. | सर्जेराव विठ्ठलराव कदम | १९७४ ते ७६ |

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेच्या १९४६ पासून १९७५-७६ पर्यन्तच्या काळामध्ये श्री. विष्णूपंत गणपतराव पाटील यांनी जास्तीतजास्त वर्षे सभापती म्हणून काम केलेले आहे. संस्थेच्या विकासामध्ये त्यांचे कार्य मोलाचे आहे. ते कदमवाडीमधील एक प्रतिष्ठित नागरिक व प्रगतीशील शेतकरी आहेत. त्यांची कदमवाडीमध्ये सामाजिक प्रतिष्ठा आहे. समाजासाठी कार्य करण्याची त्यांना आवड आहे.